दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक ३०४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२९ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

महाराष्ट्रात निरुपणाच्या बैठकीतून लोकांसाठी होणारे कामे प्रेरणादायी : खा.सुनील तटकरे

दै.रायगड नगरी । मुरुड

२०व्या शतकात महाराष्ट्र भुषण आदरणीय डॉ. ति. नानासाहेब धर्माधिकारी यांनी निरुपणाच्या बैठकीतून महाराष्ट्राला आध्यात्मिक विचार देऊन लोकांसाठी प्रेरणादायी कामे केली आहेत असे प्रतिपादन रायगड जिल्हाचे खासदार –सुनील तटकरे यांनी मुरूड पंचायत समितीच्या सभागृहास महाराष्ट्र भुषण आ.डॉ.ति. नानासाहेब धर्माधिकारी यांचे ना–वाचे अनावरण व पंचायत समिती प्रांगणात बांधलेले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आदर्श घरकुलच्या डेमो प्रदर्शन हाउसचे उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

मुरूड पंचायत समिती सभापती – आशिका ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष– मंगेश दांडेकर, शिवसेना मुरूड तालुका प्रमुख– ऋषिकांत डोंगरिकर, अनंता ठाकूर, उपसभापती चंद्रकांत मोहिते, अतिकभाई खतीब, अविनाश दांडेकर, माजी सभापती – स्मिता खेडेकर, राजश्री मिसाळ, प्रणिता पाटील,सदानंद मुंबईकर, तहसीलदार –रोहन शिंदे, माजी नगराध्यक्ष – स्नेहाताई पाटील, गटविकास अधिकारी –सुभाष वाणी, पोलिस निरीक्षक– नितीन गवारे, शुभांगी करडे, संजय गुंजाळ, आदी मान्यवर आणि दासभक्त, नागरिक उपस्थित होते.

सुनीलजी तटकरे पुढे म्हणाले की बैठकीतून आध्यात्मिक विचार देऊन व्यसनाधीन कडे वळत असलेल्या अनेक व्यक्तींना आणि तरुणांना सन्मार्गाला लावून अनेक उध्वस्त होणारे तळागाळा–तील अनेक संसार वाचविले. वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आदी सामाजिक दायित्व वाढीस लावले. तीच परंपरा आदरणीय आप्पासाहेब समर्पित कार्याने पुढे चालवत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने हाती घेतलेल्या या उदात्त कार्याची दखल जागतिक स्तरावर घेऊन ग्रीनीच बुक मध्ये नोंद करण्यात आली आहे. माझ्या यशस्वी आयुष्यात देखील त्यांच्या उत्तम आणि आध्यात्मिक विचारांचा ३३ वर्षांपासून प्रभाव असून त्यामुळे मी कधीच मागे वळून पाहिलें नाही असं विचार तटकरे, यांनी व्यक्त केले. मुरूड पंचायत समिती नूतन सभागृहास ति. नानासाहेब धर्माधिकारी या थोर विभूतीचे नाव देऊन अतिशय मोठा आदर्श ठेवला आहे. सभागृहात नानासाहेबांचे नाव सतत उत्तम विचार आणि प्रेरणा देत राहील असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला. रायगडातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, तळा भागातील पर्यटन विकास बागमांडला, आगरदांडा, सारखे रखडलेल्या पुलांची रखडलेली कामे नव्या डीपीआर मुळे निश्चित आम्ही सर्व जलद मार्गी लावू. रस्ता भूसंपादनाचा परतावा नवीन कायद्या प्रमाणे मिळेल.रेवस ते रेड्डी हा सागरी महामार्ग आगामी ३ वर्षात पूर्ण केला जाणार असून यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून या मार्गावरील ९४ पर्यटन ठिकाणे देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी देखील करण्यात येतील असे मत यावेळी व्यक्त केले.

सागर राऊत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सभापती सभापती – आशिका यांनी प्रास्ताविक केले. आमच्या प्रतिनिधीनी होणा–या सार्वत्रिक निवडणूक नगरपरिषद करिता शिवसेना–कॉग्रेस बरोबर युती होईल का असं प्रश्न यावेळी खासदार–सुनीलजी तटकरे यांना विचारणा आला त्यावेळी तटकरे म्हणाले की राज्यात तीन पक्षाचा सरकार आहे हीच युती पुढे राहावी असं मला वाटतं परंतु स्थानिक पातळीवर निर्णय घेतला जाईल. जिल्हात काही ठिकाणी झालेल्या नगरपंचायत निवडणुकीत तिघांची युती झाली नाही. परंतु ही युती व्हावी यांचे प्रयत्न करु अशी सावध प्रतिक्रिया खासदार–सुनीलजी तटकरे यांनी दिली.

विरार-अलिबाग कॉरीडॉरची जमीन मोजणीला आठ दिवस स्थगिती

दै.रायगड नगरी । उरण

उरण तहसिल कार्यालय येथे तातडीच्या घेण्यात आलेल्या बैठकीत काल २७ जानेवारी २०२२ रोजी मौजे कळंबुसरे येथील मोजणीला शेतकऱ्यांनी संघटीत पणे विरोध केल्याने प्रांत अधिकारी राहूल मुंडके यांच्या उपस्थितीत कळंबुसरे, चिरनेर, चिखली भोम, टाकी व हरिश्चंद्र पिंपळे मधील शेतकऱ्यांसोबत बैठक उरण तहसिलदार कार्यालयात झाली.

जमीनीच्या मोबदला किती देणार ? पुनर्वसनाचे पॅकेज काय असणार ? याचे स्पष्टीकरण जो पर्यंत मिळत नाही तोपर्यंत रस्त्याकरीता भुसंपादनासाठी लागणाऱ्या जमीनीची मोजणी थांबवावी ही भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. ह्या रस्त्याच्या निर्मितीचे काम एम एस एम आर डी ए करीत आहे. शेतकरी आपल्या मागण्यांवर ठाम राहिले आहेत. सन २०१३चा भूसंपादन कायद्यानुसार संपादन प्रक्रीया राबवावी, सध्या चालू बाजार भाव लक्षात घेऊन चौपट मोबदला जिल्हा अधिकाऱ्यांनी विशेष अधिकार म्हणून २५ टक्के अधिक रक्कम द्यावी.

प्रकल्पग्रस्त दाखला मिळावा व त्या परिसरात रस्त्यालगत येणाऱ्या उद्योगात रोजगार मिळावा ही भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. काही जमीनी ट्रस्ट, वक्फ बोर्डाच्या वगैरे आहेत, कसवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांना या जमीनीची किंमत व पुनर्वसनाचे लाभ मिळावेत. हा बहुउद्देशीका मार्ग असल्याने गावांना जोडणारे सर्व्हिस रोड असावेत.पाण्याच्या वहीवाटींचे मार्ग निर्माण करावेत. रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांच्या शेतीला, घरांना धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अशा विविध मागण्या मांडल्या आहेत. या बैठकीत उरणचे तहसिलदार अंधारे, जि.प. सदस्य बाजीराव परदेशी,उरण पंचायत समिती उपसभापती शुभांगी पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष ठाकूर, किसान सभा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, सेक्रेटरी संजय ठाकूर, वसंत मोहीते, रमण कासकर, गोपाळ जोशी, रविंद्र कासूकर, ॲड.अविनाश नाईक, ॲड.विजय पाटील, ॲड.प्रशांत पाटील, ॲड. निनाद नाईक, सुधाकर पाटील व पाच गावचे शेतकरी प्रातिनिधिक स्वरूपात उपस्थित होते. पोलिस अधिकारी, एम एस एम आर डी ए चे गायकवाड व माळी उपस्थित होते. १६ गावच्या बाधित शेतकऱ्यांची बैठक होऊन पुढील रणन–ीती ठरविण्यात येईल असे शेतकऱ्यांचे वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला सुरुवात

दै.रायगड नगरी । पनवेल

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला शुक्रवारी (दि. २८) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात उत्साहात सुरुवात झाली.

नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महाअंतिम फेरीचे उद्घाटन झाले. उद्घाटन समारंभाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, स्पर्धेचे परीक्षक सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेते व दिग्दर्शक विजय केंकरे, अभिनेते संजय मोने, सहप्रायोजक नील ग्रुपच्या कल्पना कोठारी आदी उपस्थित होते. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हे फक्त सांस्कृतिक व्यासपीठ नसून कलाकार निर्माण करणारे व्यासपीठ असल्याचे सांगून नगरसेवक अनिल भगत म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर हे लोकांना एक व्यासपीठ कसे निर्माण करता येईल असा विचार करून कार्यरत असतात. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सर्वव्यापी विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम या व्यासपीठामार्फत केले जाते. आपली सगळ्यांची साथ आम्हाला अशीच राहील आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादाच्या मदतीने आम्ही पुढे वाटचाल करीत राहू. प्रमुख थिएटर्स मुंबईच्या 'तिडीक' या एकांकिकेच्या प्रयोगाने स्पर्धेच्या महाअंतिम स्पर्धेला सुरुवात झाली.

पोलीस वसाहतीची मरणासन्न अवस्था सुंदर-स्वच्छ माणगांव या घोष वाक्याला छेदणारी

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

माणगांवची ब्रिटीश कालिन पोलीस वसाहत मरणासन्न अवस्थेत पडिक झाली आहे. तिचा मुख्यालयाच्या धर्तीवर जिर्णोध्दार करण्याची गरज आहे. दक्षिण रायगड आणि जिल्ह्याचा अत्यंत महत्वाचा वेगाने विकसीत होत असलेला मोठा तालुका, याठिकाणी पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलिस निरिक्षकांना तसेच पोलीसांना राहण्या साठी साधी निवास स्थानं नाहीत, ही मोठी दूर्दैवी बाब असल्याचे बोलले जात आहे.

त्याकाळी इंग्रजांच्या काळात कायदा सुव्यवस्थेतील महत्वाची भुमिका बजावणारे पोलीस आणि त्यांना राहण्या साठी पक्की दगडी पोलिस लाईन आणि पोलिस निरिक्षकाचा बंगला तसेच कचेरी, कारागृह ही एकेकाळी तालुक्याची शान होती. आज त्यांची झालेली जिर्णावस्था याला नेमकं कोण जबाबदार, रायगडचे पोलीस अधिक्षक तसेच गृहमंत्री या गोष्टींकडे कधी पाहणार ? असा सवाल ऐरणीवर आला आहे. माणगांव मध्ये महसुल वसाहत, तहसिलदार, प्रांत यांची अद्ययावत निवासस्थाने झाली आ–हेत. परंतु दूर्दैवाने पोलीस अधिकारी, पोलीस भाड्याच्या खोल्यांतून राहत आहेत, हे विदारक सत्य आहे.

चोविस तास ऑन ड्युटी, कर्तव्य जोपासणाऱ्या पोलीसांना मात्र साध्या निव–ासस्थानां पासून वंचित राहावे लागत आहे. इमानईतबारे कर्तव्य जबाबदारी पार पाडणारे पोलीस, जरी त्यांची ही व्यथा बोलुन दाखवत नसले, तरी याचे निट अवलोकन केल्यास त्यांची नाराजी लपून राहत नाही. पोलीस

मैदान आणि लाईनी परिसरात अक्षम्य दूर्लक्षाने आज जी स्थिती झाली आहे. ही एकाही लोकप्रतिनीधीला तसेच तालुक्यातील कारभार पाहणारे सक्षम अधिकाऱ्यांचे लक्षात का येत नाही ? सूंदर माणगांव स्वच्छ माणगांव या घोष वाक्याला छेदणारे हे हृदयद्रावक नग्नसत्य पाहून कोणालाही काहीच कसे वाटत नाही? विकासाच्या गप्पा मारणारे या आपल्या पारंपारिक ठेवा असलेल्या वास्तुंचे साधे जतन करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत सोयीनुसार विसरतात.

याबाबत माहिती घेतली असता आजवर आलेले अनेक पोलीस अधिकारी यांनी या वसाहतींच्या जिर्णोध्दार व नवनिर्माणा साठी खुप पाठपूरावा केला परंतु कोणीही लक्ष देत नाही, अस नैराश्येच्या भावनेतून बोलतात. पण या विषयाला कोणी हात घालायला धजावत नाही. हेच सत्य समोर येत आहे. याबाबत अनेकदा वर्तमान पत्रात

...//२

सात कोटींच्या बनावट नोटा हस्तगत

दै.रायगड नगरी । मुंबई

मुंबईच्या प्रवेशद्वारावर दहिसर चेक नाका आणि अंधेरी येथून सात जणांची धरपकड करून पोलिसांनी तब्बल सात कोटींच्या बनावट नोटा हस्तगत केल्या. परराज्यातून मुंबईत काहीजण बनावट नोटा वितरित करण्यासाठी येणार असल्याची माहिती मुंबई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील यांना मिळाली. वाहने तपासत असताना एक संशयास्पद कार पोलिसांच्या नजरेस पडली. पोलिसांनी ही कार थांबवली आणि यामध्ये बसलेल्या वसीम बुंदू सलमानी, मनोज गणेश शर्मा, सुमित ऊर्फ सॅम यशपाल शर्मा, विनोद विजयन या चौघांना ताब्यात घेतले.

पत्रकार रत्नाकर पाटील यांना पितृशोक

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील यांचे पिताश्री बाळाराम अंबू पाटील(आप्पा) यांचे नुकतेच(दि.२८ जानेवारी) रोजी सकाळी दुःखद निधन झाले. ते निवृत्त प्राथमिक शिक्षक होते. मृत्यू समयी त्यांचे वय ८३ वर्ष होते. त्यांच्या पश्चात ४ विवाहित मुले, २ विवाहित मुली, जावई, सूना, नातवंडे, पंतवंडे असा मोठा परिवार आहे. बाळाराम पाटील हे मनमिळाऊ स्वभावाचे होते, त्यामुळे त्यांच्या अंत्ययात्रेला शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि पत्रकार क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.६ फेब्रुवारी रोजी पेण तालुक्यातील रावे गावात पातळगंगेच्या तीरी होणार आहे, तसेच तेरावे विधी कार्य बुधवार दि. ९ फेब्रूवारी रोजी राहत्या घरी (मु.पो.रावे, तालुका–पेण) येथे होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले.

जेएनपीटीची वर्षभरात ५.६३ दशलक्ष टीईयूची विक्रमी माल हाताळणी

दै.रायगड नगरी । उरण

जेएनपीटीची माल हाताळणीत सातत्यपूर्ण वाढ २०२१ मध्ये सुद्धा सुरूच आहे. २०२१ मध्ये जेएनपीटी बंदरात एकूण ५.६३ दशलक्ष टीईयू (५,६३१,९४९ टीईयू) कंटेनर वाहतूक हाताळणी झाली जी २०२० च्या (४.७ दशलक्ष टीईयू) तुलनेत २५.८६ टक्के अधिक आहे. २०२१ मध्ये जेएनपीटी बंदरात एकूण ७६.१४ दशलक्ष टन वाहतूक हाताळणी झाली ज्यामध्ये ५.६३ दशलक्ष टीईयू कंटेनर वाहतूक होती. जेएनपीटीची ही आजवरची एका वर्षात हाताळलेली सर्वाधिक वाहतूक आहे.

विशेष म्हणजे भारतातील कोणत्याही बंदराद्वारे केली गेलेली आयात-निर्यात कंटेनरची ही आजवरची सर्वाधिक वाहतूक हाताळणी आहे. एनएसआईजीटी व बीएमसीटीनेने प्रथमच एका वर्षात १ दशलक्ष टीईयू पेक्षा अधिक अर्थात क्रमशः १.१७ दशलक्ष टीईयू (१,१६६,०१९) व १.१७ दशलक्ष टीईयू (१,१७०,५०२) हाताळणी केली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीत जेएनपीटी मध्ये ४,१७७,२११ टीईयू कंटेनर वाहतूक हाताळणी झाली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीतील कंटेनर वाहतुकीच्या ३,२२२,०९३ टीईयूच्या तुलनेत २९.६४ टक्के अधिक आहे.

जेएनपीटीच्या या विक्रमी कामगिरी बद्दल जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी ७३ व्या प्रजासत्ताक दिनी बंदराचे सर्व कर्मचारी, अधिकारी व भागधारकांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना श्री सेठी म्हणाले, कोविड -१९ माहामारीचे आव्हान असतानाही जेएनपीटीने केलेली शानदार कामगिरी देशाच्या आर्थिक विकासास चालना देण्याप्रती असलेल्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. या विक्रमी कामगिरीबद्दल आमचे सर्व कर्मचारी, अधिकारी व भागधारकांचे विशेष अभिनंदन. तसेच प्रथमच एका वर्षात १ दशलक्ष टीईयूचा टप्पा पार कारणा-या आमच्या एनएसआईजीटी व बीएमसीटी टर्मिनल यांचेही विशेष अभिनंदन. संपुर्ण जग जागतिक महामारीतून सावरत असताना आणि वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी, जेएनपीटीने आपल्या भागधारकांसाठी एंड-टू-एंड पोर्ट ऑपरेटर बनण्याचा निर्धार केला ज्यामुळे त्यांच्या मालाची वेळेवर आणि सुरक्षित वाहतूक सुनिश्चित होण्यास व वाहतूक खर्च कमी होण्यास खूपच मदत झाली. या वर्षी, जेएनपीटीने किनारपट्टीवरील मालवाहतुकीस चालना देण्यासाठी 'सागरमाला' कार्यक्रमांतर्गत एक नवीन समर्पित कोस्टल बर्थ तयार केला आहे. या धक्क्यावर नुकतेच प्रायोगिक तत्वावर माल हाताळणी सुद्धा सुरू केली आहे.

जेएनपीटीमध्ये एक अत्याधुनिक सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा (सीपीपी) सुरू करण्यात आले असून सीपीपीच्या ऑपरेशन्सचा लाइव डेटा यूजर्सना उपलब्ध व्हावा यासाठी एक मोबाइल ॲप - जेएनपी - सीपीपी व ई-वॉलेट लाँच करण्यात आले आहे. तसेच फॅक्टरी सीलबंद निर्यात कनटेनर्ससाठी कस्टम तपासणी सुविधा तयार करण्यासाठी भूमिपुजन करण्यात आले आहे. आयात-निर्यात कार्गोची रेल्वे वाहतूक सुव्यवस्थित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, जेएनपीटीने डबल-स्टॅक्ड ड्वार्फ कंटेनर्सच्या माध्यमातून ड्वार्फ कंटेनर ट्रेन सेवा सुरू केली आहे. ही सुविधा सुरू करून जेएनपीटीने एकाच वेळी रेल्वे-कार्गो वाहतूकीमध्ये वाढ करून आयात-निर्यात समुदायास देशांतर्गत वाहतूक खर्च कमी करून स्पर्धात्मक खर्चाचा लाभ करून दिला. देशाच्या व्यापारास चालना देण्याच्या उद्देशाने, जेएनपीटीमध्ये जागतिक मानकांनुसार बंदराची कार्यक्षमता आणि दक्षता सतत विकसित करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुनिश्चित केले जातात.

माथेरानला पर्यायी मार्गासाठी माजी नगराध्यक्षा आग्रही सनियंत्रण समिती कडे केली मागणी

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान पर्यटन नगरी विकासाच्या मार्गावर असताना येथील पर्यटनामध्ये मागील काही वर्षांमध्ये अनेक विकासकामे सुरू असल्याने प्रेक्षणीय स्थळे व रस्ते कात टाकत असताना पर्यटकांचा ओघ ही वाढू लागला आहे. त्यामुळे माथेरानसाठी पर्यायी मार्गाची गरज वाढली आहे अनेक वेळा मागणी करून ही शासन ह्या प्रश्नाला बगल देत आहे. त्यामुळे आज माथेरान येथे माथेरान सनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये माथेरानच्या माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी माथेरानच्या पर्यटन वाढीसाठी पर्यायी मार्ग असावा व त्याचे शक्यता असणारे पर्यायी मार्ग सुचविणारे निवेदन दिले.

आज माथेरान मध्ये माथेरान सनियंत्रण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती ह्यावेळी माथेरानमधील विविध समस्या तसेच येऊ घातलेल्या विकासकामांची पाहणी करण्यात आली तसेच अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. माथेरान चे पर्यटन महत्व वाढत असताना येथे एक स्वतंत्र पर्यायी रस्ता असने गरजेचे आहे सध्या येथे नेरळ मार्गे एकमेव रस्ता अस्तित्वात आहे. सलग लागून आलेल्या सुट्ट्यांमध्ये ह्या रस्त्यावर वाहतूक कोंडी तर होतेच पण वाहनस्थळासाठी जागा ही अपुरी पडत असल्याने पर्यटकांना नाहक मनस्ताप सोसावा लागत असतो. त्यामुळे माथेरानच्या पर्यटन वाढीच्या दृष्टिकोनातून माथेरान साठी पर्यायी मार्गाचे महत्व वाढू लागले आहे. माथेरानमध्ये आशियातील सर्वात मोठा रोप वे मार्ग प्रस्तावित आहे पण हा प्रकल्प सध्या बंद पडला आहे तो सुरू व्हावा. तसेच माथेरानच्या पायथ्यापासून दिल्ली साठी मार्ग जाणार आहे त्यामार्गातून माथेरांकरांना ही मार्गिका उपलब्ध व्हावी अशी मागणी आहे. खूप वर्षांपूर्वी पनवेल हुन माथेरान करिता रस्ता मंजूर झाला होता. तो माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या धोधानी गावापर्यंत येऊन पोहचला आहे. पण त्यापुढे ह्या रस्त्याचे काम होऊ शकले नाहीत काम पुन्हा सुरू करून दिल्ली महामार्गाशी त्याला जोडण्यात यावे अशी मागणी ह्यावेळी त्यांनी केली तर माथेरान साठी सर्वात प्रथम झालेला चौक मार्गे रामबाग ह्या मार्गाचे पुनर्जीवन करून हा मार्गही लवकर व्हावा अशीही मागणी ह्यावेळी दिलेल्या निवेदनामध्ये करण्यात आली. ह्यावेळी सनियंत्रण समितीचे चेअरमन बक्षी, राकेश कुमार, डेव्हिड कार्डोज माथेरानच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे व माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत उपस्थित होत्या.

राधा हरी निवास सोसायटीमधील हळदी कुंकू उत्साहात संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल टिळक रोड येथील राधा हरी निवास सोसायटीमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम एकोप्याने होत असतात. त्याचप्रमाणे दरवर्षीप्रमाणे सोसायटीमध्ये हळदी कुंकुवाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी महिलांना स्वयंपाक घरात उपयोगी असणारे साहित्य वाटप करण्यात आले. कोरोनाचे सर्व नियम पाळून समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी सोसायटीतील सर्व महिला सदस्य उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी सौ शुभांगी भोपी, सौ पूजा चोणकर, सौ पूनम गुजरे, सौ रुपाली परदेशी व सौ स्वराली देशमुख, यांनी विशेष भूमिका पार पडली.

नवजात स्त्री जातीच्या अर्भकाच्या पालकांचा शोध घेत आहेत पनवेल पोलीस

दै.रायगड नगरी । पनवेल

एक दिवसीय नवजात स्त्री जातीच्या अर्भकाच्या पालकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

तालुक्यातील नांदगाव येथील एकविरा मंदिराच्या शेजारी चाळीच्या पाठीमागील बाजूस एक दिवसीय स्त्री जातीच्या अर्भकास कोणीतरी अज्ञात स्त्री, पुरुष इसमाने सदर अर्भकाचा जन्म लपवण्याच्या हेतूने उद्देश्य पूर्वक व नवजात जिवंत बाळाचा संपूर्ण परित्याग करण्याच्या उद्देशाने अर्भकास त्या ठिकाणी सोडून दिल्याने त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आले असून याबाबत कोणालाही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्रमांक २७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेडगे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

जाहीर निविदा

दि. २८/०१/२०२२

प्रति,

अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. २९/०१/२०२२ ते ०७/०२/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ०८/०२/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रक रक्कम	इसारा रक्कम १%	कालावधी
१	पारपुंड मुख्य रस्ता ते प्रदीप पाध्ये यांच्या घरापर्यंत रस्ता दुरुस्ती व साफसफाई करणे	१००००० / -	१००० / -	३ महिने

अटी व शर्ती :-

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

सही / -
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कोळखे

सही / -
सरपंच
ग्रामपंचायत कोळखे

पृष्ठ क्र.१ वरून...

सुंदर-स्वच्छ माणगांव या घोष वाक्याला छेदणारी

बातम्या देऊनही अक्षम्य दुर्लक्षाने माणगांवचा पोलीस बंगला आता भुत बंगल्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे कि काय ? असे खेदजनक वास्तव आमच्या जवळ जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे यांनी याठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता बोलुन दाखविले आहे. माणगांवकर उपहासाने आता बोलतात शहराचे सौंदर्याला पडलेला हा काळा डाग वेळीच साफ केला पाहिजे.

या वसाहतींवर रान माजले आहे. छप्पर सडले, छताला भोक पडली, पार मोडकळीस आली, माणसांचा वावर संपला आहे. साप, किड, मुंगी, विंचू या ठिकाणी वावरतात, हेही कमी म्हणुन कि काय, येथे अपघाती मोडलेल्या, पडलेल्या गंजलेल्या गाड्यांचे भंगार पाहावयास मिळते. २६ जानेवारी रोजी सक्षम अधिकारी, माणगांवकर नागरिकांनी आपल्या संविधानाच्या उद्देशिकेचे शपथपूर्ण वाचन करताना, ज्या परिसरात आपण उभे आहोत, त्याचे विदारक वास्तव आजुबाजुला नजर टाकल्यास सहजी पाहिले आहे. त्यावेळी आपण नेमके आपले कर्तव्य जबाबदारी फक्त बोलण्या पूर्तीच उरली आहे का ? असा गंभीर सवाल ऐरणीवर आला आहे.

मा.पांडे साो कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.राजेश श्रीधर पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.क्र.१०६/२०२२
नि.नं.७/ड

श्री.संदीप गोपाळ म्हसकर
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.जाताडे, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत पोसरी,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.निर्मला गोपाळ म्हसकर यांचा मृत्यू दि.१०/०४/१९८९ रोजी मौजे : जाताडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे पोसरी ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत झालेला आहे. अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करणेची राहून गेली आहे. सबब अर्जदार यांनी त्यांची आई कै.निर्मला गोपाळ म्हसकर ह्यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कै.निर्मला गोपाळ म्हसकर ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल, तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२८/०१/२०२२ रोजी दिली.

सही / -
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही / -
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

मा.गोडसे साहेब

अर्जदाराचे वकील : ॲड.विक्रम भी. पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.५९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता. ०७/०३/२०२२

कै.कृष्णा हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर (मयत) यांचे वारस
१) श्री.प्रवीण कृष्णा कुडावकर
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
रा.वरची आळी, पनवेल उरण मार्ग, दापोली,
पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.राधाबाई कृष्णा कुडावकर
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.w/o कृष्णा कुडावकर, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
फ्लॅट नं.१, प्लॉट नं.५६६, सेक्टर नं.२८,
गणेश मंदिर जवळ, पुणे सिटी, पुणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

कै.कृष्णा हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर यांचा मृत्यू दि.१६/०१/२०२१ रोजी मु.राजलक्ष्मी अपार्टमेंट, गंगानगर निगडी, पिंपरी चिंचवड, हवेली, पुणे येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.जिजाबाई हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर यांचा मृत्यू १९८३ रोजी राहत्या घरी झाला. कै.कृष्णा हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अन्य कोणी कायदेशीर वारस नाहीत. याप्रमाणे अर्जदार हे कै.कृष्णा हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर यांचे कायदेशीर वारस आहेत.

कै.हिरु उर्फ हिऱ्या जोमा कुडावकर यांच्या नावे मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत या अर्जाचा विषय आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड

मौजे	सर्व्हे नं./हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पै.)
दापोली	९९/४	००.१५.००	०.००

अर्जदार हे कै.कृष्णा हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर यांचे कायदेशीर वारसदार आहे. कै.कृष्णा हिरु उर्फ हिऱ्या कुडावकर यांचे अर्जदार हेच त्यांचे वारसदार आहे. असा वारस दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीत मे.कोर्टात हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. वर नमूद कालावधीत हरकत न आल्यास अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही / -
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही / -
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.सारिका लबडे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.२०१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. २८/०२/२०२२

१) श्री.मोहन नाना कारंदे
वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.हरी नाना कारंदे
वय : ५२ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
दोघे रा.मु.कराडे खुर्द, पो.गुळसुंदे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. नाना सदू कारंडे हे दि.१०/०६/२०१३ रोजी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर नाना सदू कारंडे यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय. डी.सी. करिता संपादीत करण्यात आल्या आहेत.

संपादीत मिळकतींचे वर्णन

मौजे : कराडे खुर्द, पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड येथील

अ. क्र.	स.नं.	हि.नं.	क्षेत्र ए.गुं.आणा	नुकसान भरपाईची एकूण रक्कम
१	४७	३	०-३८-०	१६,९०१-४०/-

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत नाना सदू कारंडे यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत नाना सदू कारंडे यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२५ माहे ०१ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही / -
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही / -
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.गोडसे साहेब

अर्जदाराचे वकील : ॲड.विक्रम भी. पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.६७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता. ०७/०३/२०२२

कै.कांती माया कुडावकर (मयत) यांचे वारस
१) श्री.चेतन कांती कुडावकर
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.५५ दापोली, पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.चांगुणा कांती कुडावकर
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.५५ दापोली, पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

१) कै.कांती माया कुडावकर यांचा मृत्यू दि.१८/०५/२०१३ रोजी मु.दापोली, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.जिजाबाई माया कुडावकर यांचा मृत्यू १९८१ रोजी राहत्या घरी झाला. कै.कांती माया कुडावकर यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अन्य कोणी कायदेशीर वारस नाहीत. याप्रमाणे अर्जदार हे कै. कांती माया कुडावकर यांचे कायदेशीर वारस आहेत.

कै.माया जोमा कुडावकर यांच्या नावे मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत या अर्जाचा विषय आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड

मौजे	सर्व्हे नं./हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पै.)
दापोली	९९/४	००.१५.००	०.००

अर्जदार हे कै.कांती माया कुडावकर यांचे कायदेशीर वारसदार आहे. कै. कांती माया कुडावकर यांचे अर्जदार हेच त्यांचे वारसदार आहे. असा वारस दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीत मे.कोर्टात हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. वर नमूद कालावधीत हरकत न आल्यास अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही / -
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही / -
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

माणगांवमध्ये प्रथमच वधु-वर सुचक मंडळाच्या कार्यालयाचे उदघाटन

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

माणगांव शहरातील निजामपूर रोड जयंत गांधी मेमोरिअल हॉल समोर प्रथमच माय रिश्ता डॉट कॉम या वेबसाईटच्या माध्यमातून वधु-वर सुचक केंद्राचे, बुधवार दि. २६ जानेवारी सकाळी ११.०० वाजता माणगांवचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी कंपनीचे फाऊंडर अजय पेअर चेअरमन आरती पेअर माणगांवचे प्रसिध्द उद्योजक अशोकशेठ धारीया, मा.ता. पत्रकार सेवा संघ अध्यक्ष जेष्ठ पत्रकार रविंद्र कुवेसकर, महेशशेठ सुर्वे, संतोष भोरावकर आदि मान्यवर उपस्थित होते.

गत वर्षात मोठ्या प्रमाणात सुरु झालेल्या या वेबसाईट वर दोन हजाराच्यावर मुला मुलींनी आपली नाव नोंदणी केली असुन गोरगरीब ते श्रीमंत तसेच अशिक्षीत ते उच्चशिक्षीत तरुण तरुणींनी गेले तिन महिन्यात नोंदणी केलेली आहे. हा कार्यक्रम घराघरात पोहोचण्यासाठी वधु-वर सुचक कार्यालयाची गरज होती, ती आजच्या या कार्यक्रमाने पूर्ण झाली आहे. या कार्यालयात वधु-वर ऑनलाईन सर्वां साठी नोंदणी, सर्व जाती-धर्माची भरपूर स्थळे, तसेच आंतरजातीय विधवा, विधुर, अपंग, घटस्फोटीत भरपूर स्थळे उपलब्ध आहेत.

दत्तनगर, निजामपूररोड, गांधी हॉल समोर माणगांव रायगड येथे झालेल्या कार्यक्रमास माणगांव, महाड, कोलाड तसेच इतर तालुक्यातून मोठ्या प्रमाणात नागरिकांनी उपस्थिती ठेवली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालयाचे राकेश पडवळ, सतिष काळे, अनिल मोकाशी, सुहास जाधव, भावेश मिंडे, संजय भोईर तसेच अनेक मंडळाच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईची टोलवाटोलवी ; सेनेचा इशारा

दै.रायगड नगरी । कळंबोली

पनवेल आणि पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड मालाची वाहतूक केली जाते. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक सर्रासपणे सुरू आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या वाहतूक दारांवर एक प्रकारे अन्याय होत आहे. नियमानुसार ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होण्याची गरज आहे. मात्र प्रादेशिक परिवहन खात्याकडून ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर अर्थपूर्ण कारवाई केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे याबाबत जर पेण व पनवेल प्रादेशिक परिवहन खात्याने ठोस पावले उचलली नाही व कारवाई केली नाही तर संबंधित खात्याच्या विरोधात जन आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेचे अवजड वाहतूक सेनेचे राज्य अध्यक्ष इंद्रजित सिंह बल यांनी लेखी पत्रानुसार दिला आहे.

शासनाच्या नियमानुसार ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रतिटन चार हजार रुपये इतका दंड संबंधितांकडून वसूल करणे क्रमप्राप्त आहे. मात्र परिवहन कार्यालयाकडून संबंधित ओव्हरलोड मालाच्या वाहतुकीला अभय दिला जात असल्याचे निदर्शनात येत आहे. ही वस्तुस्थिती असून पनवेल आणि पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा अर्थपूर्ण वरदहस्त असल्याने अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहतूक सुरु आहेत. याचा परिणाम शासनाच्या महसुलावर होत आहे. दलालांच्या मार्फत कोट्यावधी रुपयांची हप्ते वसुली सुरु असून एक प्रकारे भ्रष्टाचाराचे कुरण या ठिकाणी झाले असल्याचा आरोप सेनेने केला आहे. ओव्हरलोड माल वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरावस्था होत आहे. त्याचबरोबर रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. या व्यतिरिक्त वाहतूक कोंडी आणि अपघाताला निमंत्रण दिले जात आहे. एकीकडे अपघात कमी व्हावे त्या अनुषंगाने परिवहन विभाग प्रयत्न करीत असताना दुसरीकडे हप्तेबाजी करून ओव्हरलोड माल वाहतुकीला अभय दिला जात असल्याची वस्तुस्थिती आहे.

या संदर्भात पेण व पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून येत्या पंधरा दिवसांमध्ये ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर योग्य ती कारवाई करावी अन्यथा पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाविरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल.

त्याचबरोबर परिवहन मंत्रालयाकडे दाद मागितली जाईल असा इशारा लेखी पत्रान्वये शिवसेनेचे राज्य अवजड वाहतूक सेनेचे अध्यक्ष इंद्रजित सिंह बल यांनी दिला आहे. यावेळी त्यांच्या समवेत पनवेल विधानसभा संघटक व रायगड जिल्हा अवजड वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष दीपक निकम, नरेश चाळके बाबू मोरे व सेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते ई-श्रम केंद्राचे उद्घाटन

दै.रायगड नगरी । पनवेल

देशातील असंघटीत कामगारांना संघटीत कामगारांप्रमाणे नोंदणी करून सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी सरकारने ई - श्रम नोंदणी अभियान सुरु केले आहे. रसायनी विभागीय काँग्रेस कमिटीने रिस कांबा येथे ई - श्रम महानोंदणी अभियान केंद्र सुरु केले आहे. या ई - श्रम केंद्राचे उद्घाटन रायगड काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आले. फळ, भाजी, हातगाडी, सलून, पेंटर, प्लंबर, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, लोहार, बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार यांना ई - श्रम योजनेचा लाभ घेता येईल. हे ई - श्रम कार्ड प्राप्त करण्यासाठी आधारकार्ड, मोबाईल नंबर व बँक पासबुकची आवश्यकता आहे. माजी सरपंच कृष्णाशेठ पारंगे व माजी खालापूरच्या पंचायत समिती सभापती सौ. कांचन पारंगे यांच्या प्रयत्नाने हे ई - श्रम केंद्र सुरु करण्यात आले. जास्तीत जास्त असंघटीत कामगारांनी याचा फायदा घ्यावा असे आवाहन महेंद्र घरत यांनी यावेळी केले.

या केंद्राच्या उद्घाटनाप्रसंगी खालापूर ता. पं. स. माजी सभापती सौ. कांचन पारंगे, माजी सरपंच श्री. कृष्णाशेठ पारंगे, खालापूर ता. काँग्रेस अध्यक्ष नाना म्हात्रे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिव निखील डवळे, NSUI रायगड जिल्हा अध्यक्ष, कुणाल जाधव, सौ. वृषाली पाटील (सभापती पं. स. खालापूर) सौ. ताई पवार (सरपंच वासांबे), सौ. श्वेता कांबळे (उपसरपंच वासंबे), सौ. राजश्री जांभळे (उपसरपंच चांभार्ली), सौ. दिपाली म्हात्रे (उपाध्यक्षा रायगड महिला काँग्रेस), सौ. सुप्रिया गायकर, प्रतिप पाटील, देविदास म्हात्रे, संतोष चौधरी, अनंत दळवी, प्रमोद राहिलकर, श्याम म्हसकर, अशोक पारंगे, पंढरीनाथ पाटील, पांडुरंग कुरुंगळे, श्रीकांत चौधरी, अक्षय मुंढे, सागर सुखदरे, नितीन पारंगे, दिवेश पाटील, संजय कांबळे, धनाजी जांभळे, प्रविण पारंगे, विवेक भोईर, सौ. माधुरी कांबळे, (ग्रा. प. सदस्य वासंबे), भगवान जांभळे, प्रशांत खाने, शयान उस्मानी, वैभव मांडे, बंटी डवळे, विनायक डवळे, भूषण म्हात्रे, बाबू वाघमारे, हरिश्चंद्र पारींगे, विश्वास पारींगे, नामदेव जांभळे, श्रीकांत चौधरी आदि उपस्थित होते.

मैत्री प्रतिष्ठान आयोजित क्रिकेट स्पर्धेत गोल्डन स्टार क्रिकेट संघ विजयी

दै.रायगड नगरी । माथेरान

मैत्री प्रतिष्ठान आयोजित टेनिस बॉल ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धेत गोल्डन स्टार क्रिकेट संघ विजयी झाला त्याना रोख पारितोषिक तीस हजार रुपये आणि आकर्षक ट्रॉफी तर रंगोळी या संघाला उपविजेते पद मिळाले आहे त्यांना पंधरा हजार रुपये रोख आणि आकर्षक ट्रॉफी देण्यात आली.

साखळी पध्दतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धे त अनेक खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावून उत्तम प्रकारे खेळ केला.या स्पर्धाचे उद्घाटन माजी नगरसेवक प्रसाद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले तर पारितोषिक वितरण माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष अजय सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष राजेश दळवी, माजी नगरसेविका वर्षा रोड्रिक्स, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष योगेश जाधव यांसह पंच क्रोशीतील नागरिक मोठया संख्येने या खेळांचा आनंद घेण्यासाठी उपस्थित होते. उत्कृष्ट समालोचन अनिल नाईकडे, मंगेश मोरे यांनी केले तर या कार्यक्रमासाठी मयुरेश कदम, किरण पेमारे, नीरज यादव, पराग सुर्वे यांसह मैत्री प्रतिष्ठान सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

रोठ खु.प्राथ.शाळेस प्रिन्टर भेट

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रोहे तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमधील कलर्स उत्पादनात अग्रगण्य असलेल्या निलिकाँन फुड डाईज अँण्ड के.लि.या कंपनीचे वतीने रैठ खु.प्राथमिक शाळेस प्रिन्टर भेट देण्यात आले आहे. येथील ग्रा. पं.सदस्य सचिन मोरे यांच्या प्रयत्नातून सदर प्रिन्टर कंपनी व्यवस्थापक गजानन बामणे व समीर पाटील यांच्या तसेच अन्य मान्यवरांचे हस्ते शाळेस भेट देण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकीचे नात्यातून निलिकाँन कंपनीचे वतीने गेली अनेक वर्षे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात समाजोपयोगी विविधांगी असे उपक्रम राबविले जात आहेत.त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सदरचे प्रिन्टर भेट देण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

काराव-गडब ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दर्शना पाटील

दै.रायगड नगरी । पेण

पेण तालुक्यातील काराव- गडब ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दर्शना संदिप पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

काराव - गडब ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण कोठेकर यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदावर दर्शना संदिप पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या वेळी ग्रामपंचायतीच्या सरपंच अर्पणा कोठेकर, माजी उपसरपंच लक्ष्मण कोठेकर, नितिन पाटील, तुलशिदास कोठेकर ग्रामसेवक संजय जाधव, ग्रामपंचायतीचे सदस्य, सदस्या यांनी नवनिर्वाचित उपसरपंच दर्शना पाटील यांचे अभिनंदन केले तर गडब -माचेळा ग्रामस्थातर्फे नारायण कोठेकर यांचे हस्ते उपसरपंच दर्शना पाटील यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते. तर ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन येथील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असे उपसरपंच दर्शना पाटील यांनी सांगितले.

मा.गोडसे साहेब

अॅड.रेणुका मि. पाटील
अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.८/२०२२
नि.नं.७
ने.ता. ०७/०३/२०२२

कै.मगशिऱ्या (मकसिर्या) बारक्या उर्फ बारकू नाईक तर्फे वारस
कै.सगुनी उर्फ नवशी मगशिऱ्या उर्फ मकसिर्या नाईक
१) कै.सत्या मगशिऱ्या (मकसिर्या) नाईक तर्फे वारस
१/१) श्रीमती.निरा सत्या नाईक
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
१/२) श्रीमती.गिता सत्या नाईक (लग्नापूर्वीचे नाव)
उर्फ गिता गोटीराम वाघे
वय : २४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.भिमा मोतीराम नाईक
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील सर्व रा.मु.पो.कळंबोली,
कातकरीवाडी, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.मगशिऱ्या (मकसिर्या) बारक्या उर्फ बारकू नाईक यांचे निधन दि.१९/१०/२०१९ रोजी मु.पो.कळंबोली, कातकरी वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून कै.मगशिऱ्या (मकसिर्या) बारक्या उर्फ बारकू नाईक यांची पत्नी कै.सगुनी उर्फ नवशी मगशिऱ्या उर्फ मकसिर्या नाईक यांचे निधन दि.१५/०७/२०१६ रोजी मु.पो.कळंबोली, कातकरी वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यांनी कै.मगशिऱ्या (मकसिर्या) बारक्या उर्फ बारकू नाईक यांच्या स्वकष्टार्जित मालकीची खालील वर्णनाची घर मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

घर मिळकतीचे वर्णन
मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड

घर नं.	घराचा प्रकार	क्षेत्रफळ	घसारा दर
१७० अ	कच्चे घर	३८.८० चौ.फूट	०.८०

वरील मिळकती ही कै.मगशिऱ्या (मकसिर्या) बारक्या उर्फ बारकू नाईक यांच्या स्वकष्टार्जित घर मिळकत असून १/१) श्रीमती.निरा सत्या नाईक १/२) श्रीमती.गिता सत्या नाईक (लग्नापूर्वीचे नाव) उर्फ गिता गोटीराम वाघे २) श्रीमती.भिमा मोतीराम नाईक यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट १/१) श्रीमती.निरा सत्या नाईक वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.मगशिऱ्या (मकसिर्या) बारक्या उर्फ बारकू नाईक यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२८/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : उसर्ली खुर्द, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती मधील काही भागाचे आमचे अशिल मेसर्स कपिलवास्तु बिल्डर अॅन्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री.विनीत राजेंद्र सोरटे ऑफिस पत्ता : शॉप नं.३६, पी.एल. १५/ड, पायल कॉम्प्लेक्स, सेक्टर १७, नवीन पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६ यांनी विकसन करण्याचा विचार केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : उसर्ली खुर्द, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

अ. क्र.	सर्व्हे व हिस्सा नंबर	भुधारणा पद्धती	मालकाचे नाव	क्षेत्र (आर. चौ.मी.)	आकार (रु.पैसे)
१	५१/अ	भोगवटा दार वर्ग-१	मे.तिरुपती बालाजी बिलकॉन प्रा.लि.तर्फे डायरेक्टर १) श्री.जनार्दन लक्ष्मण सरुखे २) श्री.सुधीर बाबुराव तोडकर ३) श्री.प्रकाश लक्ष्मण सरुखे	बिन शेती ३५-४५-००	३५४.००
२	५१/ब	भोगवटा दार वर्ग-१	मे.तिरुपती बालाजी बिलकॉन प्रा.लि.तर्फे डायरेक्टर १) श्री.जनार्दन लक्ष्मण सरुखे २) श्री.सुधीर बाबुराव तोडकर ३) श्री.प्रकाश लक्ष्मण सरुखे	बिन शेती ३६-४०-००	३६४.००
				एकूण क्षेत्र ७१-८०-००	--

एकूण क्षेत्रापैकी मालक यांचे हिश्श्यातील बांधकाम न केलेल्या क्षेत्रापैकी उर्वरित मोकळे ३०० चौ.मी. क्षेत्राचे म्हणजेच बालाजी कशिष पार्क प्रकल्पाचे फेज/विंग आय (I) चा विकसन करार करण्याचे ठरविले आहे.

सबब वर नमूद जमीन मिळकती वर किंवा जमीन मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : २८/०१/२०२२

सही/-
अॅड.प्रसाद वाकडीकर
फ्लॅट नं.००१, श्री साईप्रसाद को.ऑप.हौ.सो., सारस्वत बँकजवळ, प्लॉट नं.९८/२, स्वामी नित्यानंद रोड, ठाणा नाका, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन-४१०२०६
मो.नं.९९२०१०४०११

राव साहेब

अॅड.शशिकांत काळु म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.५३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. २३/०३/२०२२

१) रसीदुनिसा मोह समी खान
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) इश्तियाक अहमद मोहम्मद समी खान
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी
३) निसार अहमद मोहम्मद समी खान
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी
१ ते ३ रा.मुकादम कंपाऊंड, गेन अरुण कुमार वैद्य
मार्ग, चांद मदरशा गोकुळधाम समोर, मालाड ईस्ट, मुंबई
४) रफिक अहमद मोहम्मद समी खान
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी-विंग, फ्लॅट नं.१००४, सुग्रा पार्क, रानी सती मार्ग,
पठाण वाडी, मुंबई, मालाड ईस्ट, मुंबई महाराष्ट्र-४०००९७ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील पै.मोहम्मदसम्मी खैरउल्ला खान हे दि.१८/०५/२०२० मौजे : संजीवनी हॉस्पिटल, मुंबई, पी नॉर्थ वार्ड येथे मयत झालेले आहेत. तसेच पै.मोहम्मदसम्मी खैरउल्ला खान यांची आई पै.अल्लादी खातू खैरउल्ला खान या फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूची तारीख अर्जदार यांना सांगता येत नाही.

पै.मोहम्मदसम्मी खैरउल्ला खान यांचे सामाईक मालकीची, प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची खालील वर्णनाची मिळकत होती व आाहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ	आकार
महोदर, ता.पनवेल, जि.रायगड	२०९	३	१-१५-००	२.३७ रु.पै.
वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड	३४		६-९२-०० पो.ख. ३-२४-०० एकूण क्षेत्र १०-१६-००	१५.८७ रु.पै.

वर नमूद मिळकतीत पै.मोहम्मदसम्मी खैरउल्ला खान यांचे वारसदार या नात्याने अर्जदार क्र.१ ते ४ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.मोहम्मदसम्मी खैरउल्ला खान यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस पै.मोहम्मदसम्मी खैरउल्ला खान यांचे अर्जदार नं.१ ते ४ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२७/०१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.गोडसे साहेब

अॅड.रेणुका मि. पाटील
अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.७/२०२२
नि.नं.७
ने.ता. ०७/०३/२०२२

कै.तुकाराम लडक्या उर्फ चांग्या नाईक तर्फे वारस
कै.विठाबाई तुकाराम नाईक (पत्नी)
१) श्री.मच्छिंद्र तुकाराम नाईक
वय : ४० वर्षे, धंदाः शेती
२) श्री.केशव तुकाराम नाईक
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.धर्मा तुकाराम नाईक
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
४) कै.बळीराम तुकाराम नाईक मयत तर्फे वारस
४/१) श्रीमती.तुळसाबाई बळीराम नाईक
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
४/३) कु.लता बळीराम नाईक
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.मु.पो.कळंबोली, कातकरी वाडी,
ता.पनवेल, जि.रायगड
४/२) सौ.नर्मदा बळीराम नाईक (लग्नापूर्वीचे नाव)
उर्फ सौ.नर्मदा सुनील पवार
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.मोहोपाडा, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. तुकाराम लडक्या उर्फ चांग्या नाईक हे दि.०४/०७/१९९२ राजी मु.पो. कळंबोली, कातकरी वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाले असून कै. तुकाराम लडक्या उर्फ चांग्या नाईक यांची पत्नी कै.विठाबाई तुकाराम नाईक यांचे निधन दि.१४/०८/१९९६ रोजी मु.पो.कळंबोली, कातकरी वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत. कै.तुकाराम लडक्या उर्फ चांग्या नाईक यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी १) श्री.मच्छिंद्र तुकाराम नाईक २) श्री.केशव तुकाराम नाईक ३) श्री.धर्मा तुकाराम नाईक ४/१) श्रीमती.तुळसाबाई बळीराम नाईक ४/३) कु.लता बळीराम नाईक ४/२) सौ.नर्मदा बळीराम नाईक (लग्नापूर्वीचे नाव) उर्फ सौ.नर्मदा सुनील पवार यांनी अर्ज केलेला आहे.

घर मिळकतीचे वर्णन
मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड

घर नं.	घराचा प्रकार	क्षेत्रफळ	घसारा दर
१५२	कच्चे घर	१४० चौ.फूट	०.८०

वरील मिळकती या कै.तुकाराम लडक्या उर्फ चांग्या नाईक यांच्या वडिलोपार्जित मिळकती असून १) श्री.मच्छिंद्र तुकाराम नाईक २) श्री.केशव तुकाराम नाईक ३) श्री.धर्मा तुकाराम नाईक ४/१) श्रीमती.तुळसाबाई बळीराम नाईक ४/३) कु.लता बळीराम नाईक ४/२) सौ.नर्मदा बळीराम नाईक (लग्नापूर्वीचे नाव) उर्फ सौ.नर्मदा सुनील पवार हे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट १) श्री.मच्छिंद्र तुकाराम नाईक २) श्री.केशव तुकाराम नाईक ३) श्री.धर्मा तुकाराम नाईक ४/१) श्रीमती.तुळसाबाई बळीराम नाईक ४/३) कु.लता बळीराम नाईक ४/२) सौ.नर्मदा बळीराम नाईक (लग्नापूर्वीचे नाव) उर्फ सौ.नर्मदा सुनील पवार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. तुकाराम लडक्या उर्फ चांग्या नाईक यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२८/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

पनवेल शहर पोलीस ठाण्यात मनसैनिक महिलांच्यावतीने हळदीकुंकू समारंभ

दै.रायगड नगरी । पनवेल

महाराष्ट्र नवनिर्माण पनवेल शहर महिला सेनेतर्फे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पनवेल शहर पोलीस स्थानकातील महिला पोलीस कर्मचारी वर्गासोबत हळदी कुंकू समारंभ साजरी करण्यात आला.

ऑन ड्युटी २४ तास आपल्याला मदतीसाठी सदैव तत्पर असणारे पोलीस बांधव आणि भगिनी कोणताही सण असो वा कार्यक्रम तरीही आपले कर्तव्य चोखपणे बजावत असतात.

त्यांना कोणत्याच सणवाराला सुट्टी नसते. अशाच पोलीस कर्मचारी भगिनींसाठी पनवेल शहर पोलीस ठाण्यात कोरोनाचे सर्व नियम पाळून हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कोरोनाच्या काळात खबरदारीच्या अनुषंगाने आवश्यक असणारे सॅनिटायझर, मास्क आणि शृंगार उपयोगी वस्तू यावेळी महिला पोलिसांना वाण म्हणून देण्यात आले. यावेळी मनसेच्या रायगड महिला जिल्हाध्यक्षा आदितीताई सोनार, सचिव रुपाली मुरकुटे, तालुका अध्यक्ष वर्षा पाचभाई, शहर अध्यक्षा प्रीती खानविलकर, उप शहर अध्यक्ष स्वरूप सुर्वे, उप शहर अध्यक्ष योगिता गुंजाळ, रोहिणी पाटील, सोनल कदम, सुमन लवलिन, प्रज्ञा पाटील यांच्यासह सर्व महिला पदाधिकारी तसेच महिला मनसैनिक उपस्थित होते. तर पनवेल शहर महिला पोलीस निरीक्षक मनाली पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक वृषाली मॅडम आदी महिला पोलीस कर्मचारी या हळदीकुंकू समारंभाला उपस्थित होत्या.



श्रीवर्धनसारखे ऐतिहासिक शहर देश पातळीवर घेऊन जाणार : खा. सुनील तटकरे

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

उभ्या महाराष्ट्रात पहिली क वर्ग नगरपालिकेत होत आसेलली डिजिटल लायब्ररी श्रीवर्धनमध्ये होत असल्याचा अभिमान खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. गुलधे येथील साकव भूमिपूजन, श्रीवर्धन मधील डिजिटल लायब्ररी भूमिपूजन खा. सुनील तटकरे व पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, शहरअध्यक्ष जितेंद्र सातनाक, डॉ अबू राऊत, माजी नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, हरिहरेश्वर सरपंच अमित खोत, यशवंत चौलकर, सुनील पवार आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीवर्धन सारख ऐतिहासिक शहराला देश पातळीवर घेऊन जाण्याचं प्रयत्न करणार असल्याचं वक्तव्य खा सुनील तटकरे यांनी व्यक्त केलं. राज्यात मी पुन्हा येईनचा नारा लावणाऱ्यांना शरद पवार व उद्धव ठाकरेंनी दाखवलं आणि महाविकास आघाडीचे सरकार

स्थापन केला. या सरकार मधील मंत्री म्हणून काम करत असलेल्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या डिजिटल लायब्ररीचे अनेक फायदे होणार असून बुद्धिमत्तेची खान असलेल्या कोकणातील आकलन शक्तीचा योग्य पद्धतीने उपयोग होण्यासाठी ही डिजिटल लायब्ररी उपयोगी पडणार आहे. याच लायब्ररीमध्ये एम पी एस सी आय पी एस सी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार झाला पाहिजे अशी आशा व्यक्त केली. यावेळी बोलताना डम्पिंग ग्राउंड चा प्रश्न मोठं मोठ्या नगरपालिकेत सर्वत्र आहे. मात्र श्रीवर्धन पालिकेच्या डम्पिंडचा राजकीय भांडवल केलं जातं असल्याचं खा. तटकरे म्हणाले. शहर बदलत असून पर्यटकांना वाटलं पाहिजे कुलू मनाली उटीला जाण्यापेक्षा इथे येऊन राहावं अस श्रीवर्धन करण्याचं स्वप्न असल्याचं मत खा तटकरे यांनी व्यक्त केलं.

ना. आदिती तटकरे श्रीवर्धनला शैक्षणिक क्षेत्रात चांगलं वलय लाभावे. या लायब्ररीमध्ये यु पी एस सी एम पी एस सी चे त्याचबरोबर कोळी बांधवाना प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येतील. श्रीवर्धन तालुक्यातील जनतेने काम करण्याची संधी दिली. शैक्षणिक क्षेत्राबरोबर शहरासाठी क्रीडा संकुल विध्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी उभारण्यात येणार आहे.

यावेळी राज्यस्तरीय किंवा राष्ट्रस्टरीय पुरस्कार श्रीवर्धन नगरपालिकेला मिळावा अशी आशा ना. आदिती तटकरे यांनी व्यक्त केली. श्रीवर्धन नगरपालिकेच्या स्वच्छतेचं कौतुक करावे तितकं कमी आहे असल्याचं मत देखील पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

बालमजुरांची जाचातून सुटका ; चार मालकांवर गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

नवी मुंबई गुन्हेशाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने खांदेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन आस्थापनांवर छापा टाकून तीन बालकामगारांना कामाच्या जोखडातून मुक्त केले. तर बालकामगार कामावर ठेवल्याप्रकरणी दोन आस्थापनांमधील प्रत्येकी दोन अशा एकूण चार मालकांवर गुन्हा दाखल केला आहे.

अल्पवयीन मुलांना कामावर ठेवणे व त्यांच्याकडून कोणत्याही स्वरूपाचे काम करून घेणे हा गुन्हा आहे. तथापि, खांदेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत काही आस्थापन मालकांनी आपल्या आस्थापनांमध्ये लहान मुलांना कामावर ठेवले असल्याबाबतची माहिती ओएचटीयु पथकास मिळाली होती. त्यानुसार सदर पथकाने खांदेश्वर मधील तीन आस्थापनांवर छापा मारला. त्यात तीन बालकामगार गोदामात काम करताना आढळले. यात श्री देवदर्शन डेअरी, शॉप नं ३१, हावरे बिल्डीग, से ०९, खांदा कॉलनी, खांदेश्वर याठिकाणी एक बालकामगार तसेच सदर डेअरीच्या बाजुस असणाऱ्या श्री चाँमुण्डा ओल्ड पेपर मार्ट, शॉप नं ३२, हावरे बिल्डीग, से ०९, खांदा कॉलनी, खांदेश्वर याठिकाणी दोन बालकामगार हे काम करीत असताना मिळून आले. या सर्व बालकामगारांची मुक्तता करण्यात आली असून याप्रकरणी श्री देवदर्शन डेअरीचे मालक शांतीलाल छगनलालजी गुजर वय ३४ वर्ष व दिलीप छगनलालजी गुजर या दोघांविरोधात तसेच चाँमुण्डा ओल्ड पेपर मार्ट, शॉप आस्थापनेचे मालक वालाराम कालुजी पटेल, (वय ३८ वर्ष) व भगवतीलाल मेघाजी पटेल या दोघांविरोधात अशा एकूण चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

उत्कृष्ठ बी.एल.ओ. म्हणून अब्बास शेख यांचा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत गौरव

दै.रायगड नगरी । म्हसळा

राष्ट्रीय मतदार दिन निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग, रायगड यांच्याकडून जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून उत्कृष्ट इडज चा सत्कार करण्यात आला. यामध्ये म्हसळा तालुक्यातून उत्कृष्ट BLO म्हणून अब्बास शेख यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत गौरविण्यात आले. याप्रसंगी रायगड चे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव व चित्रपट अभिनेत्री प्रार्थना बेहरे, मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील,पोलीस अधीक्षक अशोक दुधे, निवासी जिल्हाधिकारी श्रीम.पद्मश्री बैनाडे आदि मान्यवर उपस्थित होते.

अब्बास शेख हे रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा मेंदडी येथे कार्यरत असून सर्व उपक्रमात अग्रेसर असतात.

निवडणूक आयोगामार्फत राबविण्यात येणारे मतदार नोंदणी मोहीमसाठी गावातील लोकप्रतिनिधी यांना भेटून, गावांमध्ये जनजागृती करून नवीन नाव नोंदणी, नाव कमी करणे, स्थलांतर, ओळखपत्र वाटप ही कामे सामाजिक बांधिलकी समजून करत असतात व अहवाल वरिष्ठांकडे वेळेवर पाठवत असतात. याचीच दखल घेऊन म्हसळा तहसील कार्यालयाच्या शिफारशीने जिल्हा स्तरावरील कार्यक्रमात प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले. याबद्दल तहसीलदार या समीर घारे, नायब तहसीलदार के. टी.भिंगारे, पाटील, तलाठी गि–हे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अरुण

पेरवी, मेंदडी हायस्कूल चे अध्यक्ष अर्षदभाई नजिरी, मुख्याध्यापक शाळेचे मुख्याध्यापक किशोर मोहिते सर्व शिक्षकवर्ग, विविध शिक्षक संघटना पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

रस्त्यांची कामे करण्यासाठी अनधिकृत नळ जोडण्यांमुळे भाजप आक्रमक

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान मध्ये अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे युद्धप–ातळीवर सुरू आहेत. ही कामे पूर्ण होत असताना त्याकडे संबंधीत अधिकारी अथवा नगरपरिषदेच्या अभियंत्यांनी लक्ष न दिल्यामुळे कामांना योग्यप्रकारे न्याय मिळालेला नाही त्यामुळे काही वर्षातच ही कामे डबघाईला येणार असल्याचे भाजपचे अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी सांगितले आहे.

पेमास्टर गार्डन कडे जाणाऱ्या रस्त्याची कामे करताना संबंधीत ठेकेदाराने तर अनेक महिन्यांपासून विना मीटर पाण्याचा वापर करण्यास सुरुवात केल्यामुळे याचा आर्थिक भुर्दंड नाहक अन्य पाणी ग्राहकांना सोसावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही असेही भाजपच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. दि.२३ रोजी गावातील रस्त्यांच्या कामाची पाहणी करताना अनधिकृत पणे पाण्याचा वापर होत असल्याची बाब निदर्शनास आल्यावर त्यांनी ताबडतोब संबंधीत ठेकेदारांना आपण हे सर्व काही कुणाच्या आशीर्वादाने ह्या अनधिकृत पणे नळ जोडण्या घेतलेल्या आहेत याचा मुख्य सूत्रधार कोण आहे. याबाबत फोनवर विचारणा केली. त्यावर ठेकेदारांच्या कामगाराने सांगितले की आम्ही पाणी कनेक्शन बाबतीत नगरपरिषदेच्या कार्यालयात रीतसर पैसे भरलेले आहेत.

तेव्हा भाजप कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले की जर रीतसर पैसे जमा केले आहेत मग पाणी वापरा बाबतीत मीटर का जोडलेले नाही त्यावर संबंधीत कामगार सुध्दा गप्प बसले.

त्यामुळे भाजपचे कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करीत ज्यांनी ज्यांनी या पाणी चोरी प्रकरणात ठेकेदारांना पाठिशी घालून हा जो काही गैरव्यवहार झाला आहे त्याची सखोल चौकशी करावी अन्यथा आम्हाला आमच्या परीने जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी वरीष्ठ पातळीवर जावे लागेल असा आक्रमक पवित्रा घेतला आहे यावेळी भाजपचे चिटणीस राजेश चौधरी, किरण चौधरी, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, संदीप नारायण कदम हे उपस्थित होते.

कातकरी उत्थान अभियानांतर्गत आदिवासी कातकरी बांधवांना दाखले, रेशनकार्ड वाटपाचा कार्यक्रम संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

शासन आणि जिल्हा प्रशासन आदिवासी समाजाच्या कायम पाठीशी असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वजण सर्वतोपरी प्रयत्नशील आहेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आज येथे केले. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकारातून कातकरी उत्थान अभियानांतर्गत आदिवासी कातकरी समाजातील बांधवांना दाखले, रेशनकार्ड वाटपाचा कार्यक्रम कोविड नियमांचे पालन करीत आज ग्रामपंचायत हॉल कुरुळ अलिबाग सभागृह येथे संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी अलिबाग प्रशांत ढगे, तहसिलदार श्रीमती मीनल दळवी तसेच अलिबाग, नागाव, चौल, रामराज, पोयनाड, चरी, कामार्ले, किहीम, सारळ या मंडळातील मंडळ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर म्हणाले की, स्थानिक तरुणांनी प्रशासकीय सेवेमध्ये येण्याकरिता गरुड झेप फाऊंडेशन तर्फे घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे. कोविड–१९ चे संकट अजून टळले

नसून आदिवासी बांधवांपैकी ज्या आदिवासी बांधवांचे लसीकरण झाले नाही, अशा आदिवासी बांधवांनी लसीकरण करून घ्यावे. या कार्यक्रमाप्रसंगी ७८ आदिवासी बांधवांना जातीचे दाखले देण्यात आले, त्याचबरोबर १७ आदिवासी बांधवांना शिधापत्रिकेचे वाटप करण्यात आले.

आरोग्यवर्धीनी केंद्र, कुरूळ, अलिबाग येथे उपस्थित १२ आदिवासी बांधवांना पहिल्या व दुसऱ्या डोस देऊन लसीकरण करण्यात आले. त्याचबरोबर १० आदिवासी बांधवांचे नवीन शिधापत्रिका मिळण्याकरिता अर्ज भरून घेण्यात आले.

उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांनी सांगितले की, जो पर्यंत शेवटच्या आदिवासी बांधवांपर्यंत आपण पोहोचत नाही, तो पर्यंत आदिवासी उत्थान अभियान यशस्वी होणार नाही, त्याकरिता सर्व मंडळ अधिकारी, तलाठी यांनी आदिवासी बांधवांना शक्य ती मदत करावी, त्यांच्या सुखदुःखाच्या प्रसंगी उपस्थित राहावे असे सांगून कार्यक्रमाची सांगता केली. तहलिसदार मिनल दळवी यांनीही आपले मनोगत व्यक्त करुन कोविड–१९ चा प्रादूर्भाव रोखण्याकरिता लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगून आदिवासी युवक–युवतींनी प्रशिक्षणाचा लाभ घेण्याकरिता आवाहन केले. आदिवासी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष भगवान नाईक यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

कर्जतमधील आरोग्य सेवा कधी सक्षम होणार : अभिनेते राहुल वैद्य

दै.रायगड नगरी । कर्जत

मुंबई –पुणे या दोन मोठ्या शहरांच्या मध्यवर्ती ठिकाण आणि तिसरी मुंबई म्हणून ज्याचा नामोल्लेख केला जातो असा कर्जत तालुका, या तालुक्यातील आरोग्य सेवा कधी सक्षम होणार असा प्रश्न कर्जत मधील रहिवाशी अभिनेते राहुल वैद्य यांनी सोशल मीडियावर उपस्थित केला आहे.

काल दि.२७ जानेवारी रोजी कर्जत येथील ज्ञानदीप सोसायटी परिसरातील रहिवासी पण सध्या मुद्रे येथील नेमिनाथयेथे वास्तव्य असणारे अँड संदीप साळवी ह्यांचे दुःखद निधन झाले.वय अवघे ३६ मृत्यूचे कारण हार्टअटॅक.त्यांच्या मागे त्यांची पत्नी आणि मुलगी,आई वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

हे वय नक्कीच जाण्याचे नाही...हा धक्का त्यांच्या कुटुंबातील सगळ्यांना आहेच तसाच आपणा सगळ्यांसाठीही आहे. हे वय भविष्यातील कल्पना सत्यात उतरवण्यासाठी झगडण्याचे वय,ती उद्दिष्टे नजरेत भरून धावपळ करण्याचे वय,आई वडिलांनी मुलासाठी बघितलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्याचे वय,आई वडिलांबरोबर पत्नी आणि मुलीचे भविष्य मार्गी लावण्याचे वय,पण नियतीच्या एका फटक्याने सगळे उध्वस्त झाले.

खरं तर हा विषय अशा पद्धतीने मांडणे बरोबर नाही अशी खंत राहुल वैद्य यांनी व्यक्त केली पण आरोग्यव्यवस्थे वर प्रश्न उभा करणारा हा विषय आहे, कर्जत सारख्या प्रगत आणि सेकंड होम साठी प्रसिद्ध असलेल्या गावी,केवळ वेळच्या वेळी चांगले उपचार मिळाले नाही आणि तशा प्रकारची उपचार व्यवस्थाच नाही ह्यामुळे एका होतकरू वकिलाचा मृत्यू अवघ्या ३६ व्या वर्षी होतो हयासारखे दुर्दैव नाही.

कर्जत मध्ये जी काही हॉस्पिटल झालीत ती अगदी अलीकडच्या काळात, उपजिल्हा रुग्णालयाच्या बाबतीत न बोललेच बरे, अगदी हाताच्या बाहेर गेले की मुंबई किंवा पुणे गाठा असे आजारी व्यक्तीच्या नातेवाईकांना सांगितले जाते.अशी कित्येक उदाहरणे आज मितीला कर्जत मधे झाली आहेत.त्यामुळे अनेक नागरिकांना त्यांच्या जीवाला मुकावे लागले आहे.

माझा प्रश्न प्रशासन आणि आतापर्यंतच्या झालेल्या आणि आत्ताच्या असलेल्या लोकप्रतिनिधी यांना आहे. मग ते पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद किंवा आमदार, खासदार असोत.राजकारण करा पण ते आरोग्यव्यवस्थे मधे नको.चांगले हॉस्पिटल त्यामध्ये सगळ्या अद्ययावत सुविधा , कोणतीही मोठी शस्त्रक्रिया तिथे होईल अशी उपकरणे व डॉक्टर, हे प्रत्यक्षात कधी साकार होईल.ह्याचे ठोस उत्तर मिळायला हवे.

माझी सर्व पक्षाच्या नेत्यांना कळकळीची विनंती आहे की निदान ह्या प्रश्नासाठी तरी आपण सगळे एकत्र येऊ शकणार नाही का ?आरोग्य व्यवस्थेसाठी सुद्धा कर्जतचे नाव अग्रणी असावे असे उपाय आता करायला हवेत..तसे होईल का ?बघा विचार करून आणि आपणही व्यक्त व्हा... तीच खरी श्रद्धांजली असेल संदीप साळवी ह्या तरुण वकिलाला अशी भावुक पोस्ट राहुल वैद्य सोशल मीडियावर टाकली आहे.

कडसुरे येथे अखंड हरिनाम सोहळा व ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या पारायणाचे आयोजन

दै.रायगड नगरी । नागोठणे

नागोठण्याजवळील कडसुरे (ता.रोहा) येथील श्री हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सोहळा व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. २९ ते रविवार दि. ३० फेब्रुवारी, २०२२ या दोन दिवशी करण्यात आले आहे. कडसुरे येथील या अखंड हरिनाम सोहळा व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायणाचे हे ३७ वे वर्ष आहे.

या अखंड हरिनाम सोहळ्याची सुरूवात शनिवार दि. २९ जानेवारीस सकाळी ८ वाजता कलश पुजन व मूर्तिपूजनाने होणार आहे. त्यानंतर ध्वजारोहण, विणापुजन, प्रतिमापुजन झाल्यानंतर ज्ञानेश्वरी वाचनाला सुरूवात होणार आहे. दोन दिवस चालणा–या या धार्मिक सोहळ्यात रोज सकाळी काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, किर्तन व जागरण होणार आहे.

या अखंड हरिनाम सोहळ्याच्या निमित्ताने ग्रथराज श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या ९ व्या व १२ व्या अध्यायाचे पारायण होणार आहे. श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन पारायण व्यासपीठाचे नेतृत्व ह.भ.प. गुरूवर्य श्री. तुकाराम बाबा बुरडीकर, ह.भ.प. गुरूवर्य श्री. विठोबा बाबा मांडलुस्कर व ह.भ.प. दिलिप महाराज शिंदे हे करणार आहेत. या अखंड हरिनाम सोहळ्यानिमित्त २९ जानेवारीस सायंकाळी ४ ते ५ वा. ह.भ.प. अनिल महाराज शिंदे यांचे प्रवचन, सायंकाळी ६ ते ८ वा. विभागीय पंचक्रोशीचा सामुदायिक हरिपाठ व नंतर रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. कैलास महाराज निश्चिंते (भिवंडी) यांचे कीर्तन होऊन नंतर जागरण होणार आहे.

तर रविवार दि. ३० जानेवारीस सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. नारायण बाबा वाजे (पंढरपूर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर मंदिराच्या भोवती पाच पालखी प्रदक्षिणा घालण्यात येणार आहेत. त्यानंतर होणाऱ्या महाप्रसादाच्या कार्यक्रमाने या अखंड हरिनाम सोहळ्याचा समारोप होणार आहे. हा धार्मिक सोहळा यशस्वी होण्यासाठी ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ कडसुरे मेहनत घेत आहेत.